जनसामान्यांच्या मनातील आरसा

Postal Lic./AMT/RNP/492/2026-28

वरुड | सोमवार
२०.०४.२०२६

# वरुड दर्पण

संपादक - चंद्रकांत भा. भड

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www. waruddarpan.com
9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: १२ | पृष्ठे: ०४ | किंमत: ०२

अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव

+91 7745067712

## थोडक्यात

### पेन्शन क्षेत्रात १००% एफडीआय

■ *(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

***नवी दिल्ली :*** - केंद्र सरकार पेन्शन क्षेत्रातील थेट परकीय गुंतवणुकीची (एफडीआय) मर्यादा १०० टक्क्यांपर्यंत वाढवण्याची शक्यता असून, यासंदर्भातील विधेयक संसदेच्या आगामी अधिवेशनात मांडले जाऊ शकते. पेन्शन क्षेत्रातील ही गुंतवणूक मर्यादा विमा क्षेत्राच्या धर्तीवर वाढवण्यात येणार आहे.

विमा क्षेत्रात सध्या १०० टक्के थेट परकीय गुंतवणुकीला परवानगी आहे. गेल्या वर्षी संसदेने विमा क्षेत्रातील 'एफडीआय' मर्यादा ७४ टक्क्यांवरून १०० टक्क्यांपर्यंत वाढवण्यास मंजुरी दिली होती. त्यापूर्वी २०१५ मध्ये विमा कायद्यात सुधारणा करून ही मर्यादा ४९ टक्क्यांवरून ७४ टक्के करण्यात आली होती.

# जम्मु-काश्मीर बस अपघात : उधमपुरमध्ये बस दरीत कोसळुन १५ प्रवाशांचा मृत्यू, अनेक जखमी

■ *(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**जम्मू-काश्मीर** - जम्मू-काश्मीरमधील डोंगराळ रस्त्यांवरील प्रवास पुन्हा एकदा जीवघेणा ठरला आहे. उधमपूर जिल्ह्यात सोमवारी (दि. २०) सकाळी प्रवासी बस दरीत कोसळल्याने भीषण अपघात झाला. या दुर्घटनेत किमान १५ जणांचा मृत्यू झाला असून २० जण जखमी झाले आहेत. अनेक जखमींची प्रकृती गंभीर असल्याने मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.



अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, रामनगर परिसरातील डोंगराळ रस्त्यावर सकाळी सुमारे १० वाजण्याच्या सुमारास हा अपघात घडला. ही बस दुर्गम भागातून उधमपूरकडे येत होती.

स्थानिकांनी सुरू केलं बचावकार्य

अपघातानंतर स्थानिक नागरिक सर्वप्रथम घटनास्थळी पोहोचले आणि जखमींना बाहेर काढण्याचे काम सुरू केले. त्यानंतर पोलीस, जिल्हा प्रशासन, राज्य आपत्ती प्रतिसाद दल आणि आरोग्य विभागाची पथके घटनास्थळी दाखल झाली. जखमींना तातडीने रुग्णालयात हलवण्यात आले असून, काही गंभीर जखमींना पुढील उपचारासाठी हलवण्याची तयारी सुरू आहे.

नेत्यांकडून शोक व्यक्त, मदतीचे आश्वासन

जम्मू-काश्मीरचे उपराज्यपाल मनोज सिन्हा यांनी या दुर्घटनेबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले. ही घटना अत्यंत हृदयद्रावक आहे.

मृतांच्या कुटुंबियांना धीर मिळावा आणि जखमी लवकर बरे व्हावेत, अशी प्रार्थना त्यांनी व्यक्त केली. तसेच प्रशासन, पोलीस, एसडीआरएफ आणि आरोग्य विभागाला तातडीने सर्वतोपरी मदत करण्याचे निर्देश दिले. मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनीही शोक व्यक्त करत, या दुःखद प्रसंगी सरकार पीडित कुटुंबांसोबत ठामपणे उभे आहे, असे सांगितले. माजी मुख्यमंत्री मेहबूबा मुफ्ती यांनीही या घटनेबद्दल दुःख व्यक्त करत जखमींच्या लवकर बरे होण्यासाठी प्रार्थना केली.

सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर

या भीषण अपघातामुळे परिसरात शोककळा पसरली असून डोंगराळ रस्त्यांवरील सुरक्षिततेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

# उत्तर कोरियाकडून समुद्राच्या दिशेने क्षेपणास्त्रांची चाचणी : आशियाई देशांमध्ये तणाव

■ *(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

***सोल :-*** संयुक्त राष्ट्रांच्या (यूएन) अणुऊर्जा संस्थेने उत्तर कोरियाच्या अण्वस्त्र निर्मितीच्या वाढत्या वेगाबद्दल गंभीर इशारा दिल्यानंतर काही दिवसांतच ही चिथावणीखोर कारवाई करण्यात आली. उत्तर कोरियाने रविवारी सकाळी समुद्राच्या दिशेने अनेक कमी पल्ल्याच्या बॅलिस्टिक क्षेपणास्त्रांचा मारा केला. संयुक्त राष्ट्रांच्या (यूएन) अणुऊर्जा संस्थेने उत्तर कोरियाच्या अण्वस्त्र निर्मितीच्या वाढत्या वेगाबद्दल गंभीर इशारा दिल्यानंतर काही दिवसांतच ही चिथावणीखोर कारवाई करण्यात आली आहे.

दक्षिण कोरियाच्या 'जॉइंट चिफ्स ऑफ स्टाफ'ने दिलेल्या माहितीनुसार, ही क्षेपणास्त्रे उत्तर कोरियाच्या सिनपो परिसरातून डागण्यात आली. या क्षेपणास्त्रांनी पूर्व समुद्राच्या दिशेने साधारण १४० किलोमीटर (८७ मैल) प्रवास केला. या घटनेनंतर दक्षिण कोरियाचे लष्कर हाय अलर्टवर असून, ते अमेरिका आणि जपानसोबत सातत्याने माहितीची देवाणघेवाण करत आहेत.





दक्षिण कोरियाच्या राष्ट्रीय सुरक्षा परिषदेने तातडीची बैठक बोलावून या चाचण्यांचा तीव्र निषेध केला आहे. विशेष म्हणजे, दक्षिण कोरियाचे अध्यक्ष ली जाय-म्युँग भारत आणि व्हिएतनामच्या दौऱ्यावर रवाना होण्यापूर्वी काही तास आधी ही क्षेपणास्त्र डागण्यात आली. राजकीय संदर्भ तज्ज्ञांच्या मते, उत्तर कोरियाच्या या सातत्याच्या चाचण्यांचे कनेक्शन अमेरिकेच्या राजकारणाशी असू शकते. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आगामी मे महिन्यात चीनमध्ये शी जिनपिंग यांची भेट घेणार आहेत. या भेटीपूर्वी आपली ताकद दाखवून भविष्यातील चर्चेत वरचढ ठरण्यासाठी किम जोंग उन हे दबावतंत्र वापरत असल्याचे बोलले जात आहे.

# मोदींकडून सरकारी यंत्रणेचा गैरवापर

## ममता बॅनर्जी यांचा गंभीर आरोप

■ *(प्रतिनिधी वरुड दर्पण)*

***तारकेश्वर :-*** पंतप्रधान नरेंद्र मोदी हे राजकीय प्रचारासाठी सरकारी यंत्रणेचा 'गैरवापर' करत असल्याचा खळबळजनक आरोप पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी रविवारी केला. हुगळी जिल्ह्यातील तारकेश्वर येथे एका निवडणूक प्रचार सभेत त्या बोलत होत्या.



महिला आरक्षण विधेयकाबाबत देशाला संबोधित करताना पंतप्रधानांनी भाजपसाठी 'बेकायदेशीर प्रचार' केल्याचा दावा ममता बॅनर्जी यांनी केला आहे. त्या म्हणाल्या, भाजपने काल राजकीय प्रचारासाठी सरकारी यंत्रणेचा गैरवापर केला. आम्ही याचा तीव्र निषेध करतो आणि याप्रकरणी निवडणूक आयोगाकडे तक्रार करणार आहोत.' पंतप्रधानांनी आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन केल्याचा आरोपही त्यांनी यावेळी केला.

प्रकरण काय

कायदेमंडळात महिलांना ३३ टक्के आरक्षण देणारे विधेयक २०२९ पासून लागू करण्याबाबतचे विधेयक लोकसभेत फेटाळल्यानंतर, शनिवारी पंतप्रधानांनी देशाला संबोधित केले होते. यावेळी मोदींनी काँग्रेस आणि मित्रपक्षांना इशारा दिला होता की, 'भ्रूणहत्येच्या पापासाठी' भारतातील महिला त्यांना कठोर शिक्षा करतील. यावर ममता म्हणाल्या, 'तुम्ही तुमच्या पक्षासाठी बेकायदेशीर प्रचार करत आहात, याचे उत्तर तुम्हाला देशातील जनतेला द्यावे लागेल. महिला आरक्षण विधेयक सप्टेंबर २०२३ मध्येच मंजूर झाले होते.

आय-पॅकने काम थांबवल्याचे वृत्त तृणमूलने फेटाळले

निवडणूक रणनीतीकार कंपनी 'आय-पॅक'ने पश्चिम बंगालमधील आपले काम थांबवल्याचे वृत्त तृणमूल काँग्रेसने पूर्णपणे फेटाळून लावले आहे. ही बातमी 'पूर्णपणे निराधार' असल्याचे सांगत, भाजपच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकार निवडणुकीच्या काळात तृणमूलची प्रचार यंत्रणा कमकुवत करण्यासाठी भीतीचे वातावरण निर्माण करत असल्याचा आरोप पक्षाने रविवारी केला.

२०२१ पासून तृणमूल काँग्रेसच्या निवडणूक प्रचाराची धुरा सांभाळणाऱ्या 'इंडियन पॉलिटिकल अ‍ॅक्शन कमिटी'ने आपल्या कर्मचाऱ्यांना तत्काळ काम थांबवून २० दिवसांच्या सुटीवर जाण्यास सांगितल्याच्या बातम्या समोर आल्या होत्या. या पार्श्वभूमीवर तृणमूलने ही तीव्र प्रतिक्रिया दिली आहे.

एका वृत्तपत्रातील दाव्यानुसार, आय-पॅकने शनिवारी रात्री कर्मचाऱ्यांना एक ईमेल पाठवला होता. त्यात 'कायदेशीर बंधनांचा' हवाला देत ११ मे पर्यंत पश्चिम बंगालमधील काम स्थगित राहील, असे म्हटले होते.

मात्र, आय-पॅकने अधिकृतपणे कोणतीही भूमिका अद्याप मांडलेली नाही. तृणमूलने मात्र अधिकृत प्रसिद्धीपत्रक काढून स्पष्ट केले की, आय-पॅक प्रचारातून मागे हटलेली नाही. आय-पॅकचे थेट नाव न घेता त्या म्हणाल्या की, जर केंद्रीय यंत्रणांच्या दबावामुळे या कर्मचाऱ्यांना नोकऱ्या सोडाव्या लागल्या, तर आमचा पक्ष त्यांना सामावून घेईल.

## परतवाडा प्रकरणात होणार मोठा पर्दाफाश?

# आरोपींच्या ५ पैकी ३ मोबाईलचा डेटा रिकव्हर करण्यात पोलिसांना यश

■ *(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

***अमरावती :-*** अमरावती परतवाडा लैंगिक शोषण प्रकरणात जप्त केलेल्या आरोपींच्या ५ पैकी ३ मोबाईल्सचा डेटा रिकव्हर करण्यात पोलिसांना यश आले आहे. त्यामुळे या प्रकरणातील अनेक गुपिते समोर येण्याची शक्यता वाढली आहे. परतवाडा लैंगिक शोषणाचे राज्याच्या राजकारणात तीव्र पडसाद उमटत आहेत. या प्रकरणातील आरोपींवर पीडित तरुणींचे लैंगिक शोषण करून त्यांचे अश्लील व्हिडीओ सोशल मीडियात व्हायरल करण्याचा आरोप आहे.



पोलिसांनी आरोपीचे ५ मोबाईल फोन जप्त केले होते. या मोबाईल्समध्ये सर्व आक्षेपार्ह व्हिडीओ, फोटो व चॅट्स होते. आरोपींनी पुरावे नष्ट करण्यासाठी ते डिलीट केले होते. स्थानिक पातळीवर हा डेटा रिकव्हर करणे अवघड होते. त्यामुळे पोलिसांनी हे पाचही मोबाईल तांत्रिक विश्लेषणासाठी न्यायवैद्यक प्रयोगशाळेकडे पाठवले होते. आरोपींच्या बँक खात्यांची, व्यवहारांचीही चौकशी

न्यायवैद्यक प्रयोगशाळेच्या अहवालानुसार, ३ मोबाईलमधील डेटा पूर्णपणे रिकव्हर झाला आहे. त्यामुळे डिलीट केलेले व्हिडीओ व फोटो पुन्हा रिस्टोअर झाले आहेत. या रिकव्हर डेटाच्या मदतीने आता पोलिस या रॅकेटमध्ये आणखी कुणाचा सहभाग आहे का? तसेच या प्रकरणी आणखी काही तरुणींची फसवणूक झाली आहे का? याचा शोध घेण्याचा प्रयत्न करणार आहेत. या प्रकरणी आरोपींच्या बँक खात्यांची व आर्थिक व्यवहाराचीही चौकशी केली जाणार आहे. अमरावती जिल्ह्यातील परतवाडा येथे तरुणींना प्रेमाच्या जाळ्यात ओढून त्यांचे लैंगिक शोषण व ब्लॅकमेल करण्यात आल्याचे गंभीर गुन्हे घडल्याची बाब पुढे आली आहे.



# जिल्हा परिषद शाळा काटी शाळेच्या इमारतीच्या रंगरंगोटीकरिता किरण बोहरुपी याचेकडून ५ हजारांची मदत

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – जिल्हा परिषद शाळा काटी येथे शाळेच्या इमारतीच्या रंगरंगोटीकरिता पंचायत समिती येथे लिपिक पदावर कार्यरत असलेल्या किरण बोहरुपी यांनी अत्यंत उदार मनाने रुपये ५ हजार रुपये देणगी दिली. त्यांच्या या सहकार्यामुळे शाळेचे कार्यालय अधिक आकर्षक, स्वच्छ व सुंदर बनले असून विद्यार्थ्यांसाठी आनंददायी वातावरण निर्माण झाले आहे.



शिक्षण क्षेत्राबद्दलची त्यांची जाणीव, सामाजिक बांधिलकी व शाळेबद्दलची आत्मीयता या कृतीतून स्पष्टपणे दिसून येते. त्यांच्या या मदतीमुळे शाळेच्या सौंदर्यात भर पडली असून विद्यार्थी व शिक्षिकामध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

यापसंगी काटी ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच व सर्व सदस्य, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष, उपाध्यक्ष व सर्व सदस्य गण यांनी कौतुक केले. गाडेगाव केंद्राचे केंद्रप्रमुख अरविंद वानखडे यांनी सुद्धा या प्रेरणादायी कार्याचे कौतुक व अभिनंदन केले. मुख्याध्यापक संजय फुटाणे, संगीता कहाते, सुनिता वानखडे, कांचन कुटे सर्व सहकारी शिक्षिका, विद्यार्थी त्यांच्या यांच्या वतीने त्यांचे आभार व्यक्त करण्यात आले. 'समाजातील प्रत्येक व्यक्तीने शिक्षणासाठी अशा प्रकारे पुढाकार घेतल्यास शाळांचा सर्वांगीण विकास होईल,' असे मत शिक्षकांनी व्यक्त केले.

समाजातील एका माणसाने गावच्या शाळेसाठी एक क्रांतिकारी पाऊल उचलले तर गावच्या शाळेचा विकास होण्यास वेळ लागणार नाही असे या प्रसंगातून दिसून येत आहे. याबद्दल किरण बहुरुपी यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## एनटीआर हायस्कूलमध्ये

# भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती साजरी

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – येथील एनटीआर हायस्कूलमध्ये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात, प्रेरणादायी वातावरणात व भक्तिभावाने साजरी करण्यात आली.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक योगेश बरडीया होते. कार्यक्रमाला नवयुवक शिक्षण संस्थेचे सचिव जगदीश नेरकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच पर्यवेक्षक शशांक पाचघरे, शिक्षक प्रतिनिधी उज्वल वानखडे यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करुन करण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी बाबासाहेबांच्या विचारांना अभिवादन करत त्यांच्या कार्याची आठवण करुन दिली. संविधानाचे शिल्पकार, समाज सुधारक आणि शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करणारे महान व्यक्तिमत्त्व म्हणून बाबासाहेबांचे योगदान अधोरेखित करण्यात आले. विद्यार्थ्यांनी जयंतीनिमित्त प्रभावी भाषणे सादर केली. प्रमुख वक्ते म्हणून रितेश राइकवार यांनी डॉ.आंबेडकरांच्या जीवनकार्याचा सखोल आढावा घेत विद्यार्थ्यांना शिक्षण, समता व न्याय या मूल्यांचे पालन करण्याचे आवाहन केले. तसेच सीमा सयाम यांनीही भाषणातून बाबासाहेबांच्या विचारांची प्रेरणा व्यक्त केली. यावेळी अध्यक्षीय भाषणात मुख्याध्यापक योगेश बरडिया यांनी विद्यार्थ्यांना बाबासाहेबांचे विचार आचरणात आणण्याचे महत्त्व पटवून दिले. शिक्षणाच्या माध्यमातून स्वतःचा व समाजाचा विकास साधावा, असा संदेश त्यांनी दिला. प्रमुख उपस्थिती जगदीश नेरकर यांनीही बाबासाहेबांच्या संघर्षमय जीवनाची प्रेरणा विद्यार्थ्यांसमोर मांडली.

कार्यक्रमाचे संचालन विलास टाकरखेडे यांनी केले. संपुर्ण कार्यक्रमात विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव, संविधानिक मूल्यांची जपणूक व समानतेचा संदेश रुजवण्याचा प्रयत्न करण्यात आला.

## बाल सुसंस्कार आध्यात्मिक शिबीर समितीच्या वतीने

# ३ ते १५ मे दरम्यान बालसुसंस्कार निवासी शिबिर

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

***शेंदुरजनाघाट*** – येथील बाल सुसंस्कार आध्यात्मिक शिबीर समितीच्या वतीने ह.प.पू.गुरुवर्य रामचंद्रबाबा बोरी यांच्या प्रेरणेने भव्य बाल सुसंस्कार निवासी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबीर ३ ते १५ मे या कालावधीत नगरपरिषद शाळा क्र.३, पाण्याच्या टाकीजवळ, तिवसा रोड शेंदुरजनाघाट येथे संपन्न होणार आहे.



**अध्यात्म आणि व्यक्तिमत्व विकासाचा संगम**

विद्यार्थ्यांमध्ये सदाचार, स्वयंशिस्त आणि नैतिक मूल्यांची रुजवणूक व्हावी, या उद्देशाने आयोजित या शिबिरात विविध विषयांचे मार्गदर्शन केले जाणार आहे. यात प्रामुख्याने श्रीमदब भगवद्गीता (अध्याय १२ व १५), संस्कृत सुभाषिते, अष्टके, ओव्या, हरिपाठ आणि अभंग यांसारख्या आध्यात्मिक विषयांचा समावेश आहे. तसेच सामान्य ज्ञान, थोरांची चरित्रे, व्यसनमुक्ती आणि व्यक्तिमत्व विकास या विषयांवर तज्ज्ञ वक्त्यांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

**सांस्कृतिक व शारीरिक शिक्षण**

शिबिरात केवळ बौद्धिकच नव्हे तर शारीरिक विकासावरही भर दिला जाणार आहे. यामध्ये शास्त्रोक्त गायन, मृदंग वादन, हरिपाठ, पावल्या, योग-प्राणायाम आणि विविध खेळांचे प्रशिक्षण दिले जाईल.

**प्रवेश व नियमावली**

वयोमर्यादा: ८ ते २० वर्षे (मुले व मुलींसाठी) प्रवेश शुल्क : ५०० रुपये, साहित्य : शिबिरात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांनी स्वतःसोबत पांढरे कपडे (बंगाली, पायजमा, टोपी), ताट, प्लेट, वाटी, ग्लास, चमचा, चादर, सतरंजी आणि हरिपाठासाठी टाळ सोबत आणणे अनिवार्य आहे.

**तज्ज्ञ प्रशिक्षकांचे लाभणार मार्गदर्शन**

या शिबिराचे मुख्य मार्गदर्शक म्हणुन विश्व हिंदू परिषदेचे धर्माचार्य ह.भ.प.भुषण महाराज शिंगरवाडे हे असून प्रशिक्षक म्हणुन ह.भ.प.बंटी महाराज गिरे, ह.भ.प.भागवताचार्य किर्ती शिंगरवाडे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत.


शिबिरातील विद्यार्थ्यांच्या भोजन व्यवस्थेसाठी दानशुर व्यक्तींनी अन्नदानास मदत करावी, असे आवाहन समितीने केले आहे. इच्छुकांना एका वेळेची किंवा दोन वेळेची पंगत दान करता येईल.

अधिक माहितीसाठी किंवा नाव नोंदणीसाठी ९९२२४९८३५० या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन बाल सुसंस्कार आध्यात्मिक शिबीर समिती, शेंदुरजनाघाट यांनी केले आहे.

# पुंडलिकराव भामकर यांचे निधन

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – येथुन जवळच असलेल्या वघाळ येथील किराणा व्यवसायिक तथा प्रगतीशील शेतकरी पुंडलिकराव भामकर यांचे दि.१६ ला राहते घरी वृद्धापकाळाने निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ८२ वर्षे होते.




त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना नातवंडे व बराच मोठा आप्त परिवार आहे.

आज दि.१७ ला वघाळ येथील स्मशानभूमीत त्यांचे पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी मोठ्या संख्येने गावकरी, नातेवाईक उपस्थित होते.

# वरुड नगरीत राष्ट्रसंताच्या भजनाचा जागर !

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** –एप्रिल महिन्यात अनेक संत–महापुरूष कर्मयोगी गोरोबाकाका, संत सेना महाराज यांची जयंती तसेच शिक्षणमहर्षी डॉ.भाऊसाहेब देशमुख, क्रांतीसुर्य महात्मा फुले, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महामानवाची जयंती पुण्यतिथी साजरी होत असतांनाच दिनांक १ ते ३०एप्रिल दरम्यान गावांचा जन्मदिवस अर्थात गावा गावात ग्रामजयंती महापर्व साजरे करिता असतांनाच शनिवार दिनांक १८ रविवार दिनांक १९ एप्रिल २०२६ रोजी वरूड नगरीत विश्वसंत वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांच्या 'खंजिरी भजनाचा जागर 'होणार असून महाकवी राष्ट्रसंतानी खंजिरी भजनाच्या व्दारे दिडशे वर्षांची गुलामगिरी हटवून देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले असून महान क्रांती केली.त्यांची राष्ट्रीय भजने जगप्रसिद्ध असून राष्ट्रसंताची राष्ट्रवंदना खऱ्या अर्थाने राष्ट्रगीत मानल्या जाते.या स्पर्धेत आतापर्यंत महाराष्ट्रातील तीस भंजन मंडळानी आपली नोंदणी केली आहे.भजन स्पर्धेत सहभागी भजन मंडळाच्या सहभागी कलावंतांचा विशेष गौरव करण्यात येणार असून भजन स्पर्धा करीता तीन लक्ष एक्केचाळीस हजार रुपयांचे बक्षीसे वितरण करण्यात येईल.



करिता जास्तीत जास्त पुरुष, महिला व बाल भजनी मंडळानी सहभागी व्हावे. शनिवारी दिनांक १८ एप्रिल रोजी सकाळी १०वाजता अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवा मंडळाचे आजीवन प्रचारक हरिभाऊ वेरुळकर गुरुजी यांच्या शुभहस्ते उद्घाटन असे आवाहन अखिल भारतीय श्रीगुरूदेव सेवा मंडळ, श्री गुरुदेव अध्यात्म केंद्र, श्री गुरुदेव राष्ट्रधर्म प्रचार समिती व वरूड नगरीचे वतीने करण्यात आले आहे. भजन स्पर्धा सहभागी होण्यासाठी श्री मनिष विजय कुबडे भ्रमणध्वनी ९४२२८५७५७९ यावर संपर्क साधावा असे एका पत्रकाद्वारे कळिवले आहे.

# मोठा भाजी बाजार 'कुत्र्यांच्या ताब्यात' : प्रशासनाचे दुर्लक्ष उघड

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)

## कुत्र्यांचा उपद्रव वाढला : मोकाट कुत्र्यांवरील कारवाही शून्य

**वरुड** – शहरातील मोठा भाजी बाजार परिसरातील एका पाळीव कुत्र्याने अनेक नागरिकांना चावा घेतल्याच्या घटना समोर आल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या संदर्भात परिसरातील नागरीकांनी नगरपरीषदेचे मुख्याधिकारी यांना लेखी तक्रार देऊन सुद्धा नगरपरिषद प्रशासन कुंभकर्णी झोपेत असुन उद्यापही कुठलीच कार्यवाही करण्यात आली नाही.



प्राप्त माहितीनुसार, शहरातील मोठा भाजी बाजार परीसरात संबंधित कुत्रा दिलीप नथ्थुजी पाटणकर यांचा असल्याचे स्थानिकांकडून सांगण्यात येत आहे. या कुत्र्यामुळे परीसरातील महिला, पुरुष तसेच लहान मुलांच्या जीवाला धोका निर्माण झाला असून नागरिकांमध्ये प्रचंड संताप व्य केला जात आहे.

या संदर्भात नगरपरिषद वरुड येथे लेखी तक्रार देऊनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही, याबाबत आश्चर्य व्यक्त करण्यात येत आहे.

नगरपरिषद प्रशासन एखाद्याचा जीव गेल्यानंतरच जागे होणार का? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. परिसरातील रहिवाशांनी या कुत्र्याचा तातडीने बंदोबस्त करण्याची जोरदार मागणी केली आहे. त्या कुत्र्याला पकडुन त्याचे मालकाविरुद्ध तातडीने फौजदारी गुन्हा दाखल करून कार्यवाही करा, अन्यथा आता परीसरातील महिला, पुरुष बालकांसह वरुड नगरपरीषदेचे मुख्याधिकारी यांचे कक्षात अनपेक्षित पणे ठिय्या आंदोलन करणार असल्याचा थेट इशारा माध्यमांशी बोलतांना परीसरातील महिलांनी दिला आहे.

दरम्यान, प्रशासनाने या गंभीर प्रकरणाची तात्काळ दखल घेऊन योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी सुद्धा नागरीकांकडून केल्याजात आहे.



**अन्यथा ठिय्या आंदोलन करु**

" त्या कुत्र्यासंदर्भात लेखी तक्रार देऊन सुद्धा मुख्याधिकारी किंवा आरोग्य निरीक्षक कार्यवाही करीत नसेल तर आम्हाला नाईलाजास्तव ठिय्या आंदोलन करावेच लागेल.

–मोनाली सागर श्रीराव



**जिव गेल्यानंतर कार्यवाही करणार का?**

" या कुत्र्याने माझ्या मुलासह परिसरतील अनेकांना चावा घेतल्याच्या घटना घडून सुद्धा त्या कुत्र्याला पकडुन त्याचे मालकाविरुद्ध का नगरपरीषद का कार्यवाही करीत नाही.

–नम्रता अमोल गुर्जर



**गांभीर्य ओळखून कार्यवाही करा**

" या कुत्र्याने परीसरात एकाला नसून अनेकांना चावा घेणे ही साधारण घटना नाही. म्हणून या घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन नगरपरिषद प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी.

–प्राजक्ता संदिप बेहरे



**तक्रार देउन कार्यवाही नाही**

" त्या कुत्र्या संदर्भात लेखी तक्रार देऊन सुद्धा नगरपरिषदेचे आरोग्य निरीक्षक चोचमकर यांनी कुठलीच कार्यवाही केली नसल्याने नागरीकांमध्ये संताप व्यक्त केल्याजात आहे.

–सोनाली प्रविण गुल्हाणे



**निराधाराला तातडीने मदत करा**

" मोठा भाजी बाजार परिसरात सुखदेव तडस म्हणून निराधार इसम राहतो त्याला त्याच कुत्र्याने चावा घेतल्यामुळे नगरपरिषद प्रशासनाने त्याला तातडीची आर्थिक मदत करावी.

–मिनाक्षी अमोल टाकरखेडे



**नगरपरिषद कुंभकर्णी झोपेत**

" या कुत्र्या संदर्भात लेखी तक्रार देउन सुद्धा कार्यवाही होत नसेल तर त्या कुत्र्याच्या मालकाला नगरपरीषद प्रशासन पाठबळ तर देत नाही ना? की खरोखर संबंधीत अधिकारी कुंभकर्णी झोपेतच आहे.

–संजना सुरज खंडेलवाल



**तातडीने कार्यवाही व्हायलाच हवी**

" एखाद्याचा पाळीव कुत्रा अनेकांना चावा घेउन सुद्धा नगरपरिषद प्रशासन या गंभीर घटनेकडे दुर्लक्ष करीत असेल तर नगरपरीषद प्रशासनाविरुद्ध आता कार्यवाहीची मागणी करावी लागेल.

–अंकिता अंकुश गुल्हाणे

# संपादकीय

**चला आपले आज आपण येणाऱ्या पिढीच्या उज्वल भविष्या साठी त्याग करू.**

## तंत्रज्ञानाची नवी क्षितिजे व मानवी संभ्रम

आजचे जग हे तंत्रज्ञानाच्या वेगाने धावणारे जग आहे. कालपर्यंत जे केवळ विज्ञानकथांमध्ये वाचायला मिळायचे, ते आज आपल्या हातातील स्मार्टफोनमध्ये 'एआय' च्या रूपाने अवतरले आहे. चॅटजीपीटीपासून ते डीपफेकपर्यंतच्या प्रवासाने मानवी बुद्धिमत्तेलाच एका मोठ्या वळणावर आणून उभे केले आहे.

**बदलाचे वारे**

तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे ही मानवाची प्रवृत्ती आहे. अग्नीचा शोध असो वा चाकाचा, प्रत्येक शोधामुळे मानवी जीवन सुसह्य झाले. आज एआयमुळे वैद्यकीय क्षेत्रात अचूक निदान करणे शक्य झाले आहे, तर गुंतागुंतीची गणिती समीकरणे काही सेकंदात सुटत आहेत. उद्योगांमध्ये कार्यक्षमता वाढली आहे. हे सर्व पाहता, एआय हे विज्ञानाने दिलेले एक वरदानच वाटते.

**भीती कशाची?**

मात्र, या नाण्याला दुसरी बाजूही आहे. जसजसे एआय प्रगत होत आहे, तसतशी 'नोकऱ्या जातील का?' ही भीती सर्वसामान्यांच्या मनात घर करत आहे. सर्जनशील कामे, जी आजवर केवळ मानवी मेंदूच करू शकत होता, ती आता यंत्रे करू लागली आहेत. लेखणीपासून ते कुंचल्यापर्यंत सर्वच क्षेत्रात यंत्रांचा शिरकाव झाला आहे.

सर्वात मोठा धोका म्हणजे 'नैतिकता' आणि 'गोपनीयता'. 'डीपफेक' सारख्या तंत्रज्ञानामुळे खोट्या बातम्या आणि बनावट व्हिडिओंचा सुळसुळाट झाला आहे, ज्यामुळे सामाजिक शांतता धोक्यात येऊ शकते. जर यंत्रांकडे स्वतःचा विवेक नसेल, तर त्यांनी घेतलेले निर्णय मानवी मूल्यांना धरून असतील का, हा कळीचा प्रश्न आहे.

**मध्यममार्ग गरजेचा**

आता प्रश्न असा उरतो की, आपण या तंत्रज्ञानाला घाबरून पळ काढायचा की त्याचा स्वीकार करायचा? इतिहास सांगतो की, तंत्रज्ञान कधीच थांबत नाही. त्यामुळे एआयला विरोध करण्यापेक्षा त्याचा 'सहकारी' म्हणून वापर करणे हीच काळाची गरज आहे. माणसाने यंत्राच्या गुलामगिरीत न अडकता, यंत्रावर आपले नियंत्रण ठेवले पाहिजे.

अखेर, एआय हे मानवी मेंदूनेच तयार केलेले एक साधन आहे. ते साध्य नाही. जोपर्यंत या तंत्रज्ञानाचा वापर लोककल्याणासाठी आणि मानवी मूल्ये जपण्यासाठी केला जाईल, तोपर्यंत भीतीचे कारण नाही. पण जर हे तंत्रज्ञान विवेकाची जोड नसलेल्या हातांत गेले, तर मात्र 'भस्मासुर' व्हायला वेळ लागणार नाही. शासनाने यावर कडक नियमावली आणणे आणि नागरिकांनी साक्षर होणे, हाच यावरील एकमेव उपाय आहे.

'शेवटी, मानवी भावना आणि संवेदनशीलता यांची जागा कोणतीही निर्जीव यंत्रणा घेऊ शकत नाही. तंत्रज्ञानाचा वेग आणि मानवाचा विवेक यांचा सुवर्णमध्य साधणे हीच २१ व्या शतकातील सर्वात मोठी कसोटी आहे. आपण यंत्रांचे 'चालक' बनायचे की 'दास', याचा निर्णय घेण्याची वेळ आता आली आहे.' जचे जग हे तंत्रज्ञानाच्या वेगाने धावणारे जग आहे. कालपर्यंत जे केवळ विज्ञानकथांमध्ये वाचायला मिळायचे, ते आज आपल्या हातातील स्मार्टफोनमध्ये 'एआय' च्या रूपाने अवतरले आहे. चॅटजीपीटीपासून ते डीपफेकपर्यंतच्या प्रवासाने मानवी बुद्धिमत्तेलाच एका मोठ्या वळणावर आणून उभे केले आहे.

**बदलाचे वारे**

तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे ही मानवाची प्रवृत्ती आहे. अग्नीचा शोध असो वा चाकाचा, प्रत्येक शोधामुळे मानवी जीवन सुसह्य झाले. आज एआयमुळे वैद्यकीय क्षेत्रात अचूक निदान करणे शक्य झाले आहे, तर गुंतागुंतीची गणिती समीकरणे काही सेकंदात सुटत आहेत. उद्योगांमध्ये कार्यक्षमता वाढली आहे. हे सर्व पाहता, एआय हे विज्ञानाने दिलेले एक वरदानच वाटते.

**भीती कशाची?**

मात्र, या नाण्याला दुसरी बाजूही आहे. जसजसे एआय प्रगत होत आहे, तसतशी 'नोकऱ्या जातील का?' ही भीती सर्वसामान्यांच्या मनात घर करत आहे. सर्जनशील कामे, जी आजवर केवळ मानवी मेंदूच करू शकत होता, ती आता यंत्रे करू लागली आहेत. लेखणीपासून ते कुंचल्यापर्यंत सर्वच क्षेत्रात यंत्रांचा शिरकाव झाला आहे.

सर्वात मोठा धोका म्हणजे 'नैतिकता' आणि 'गोपनीयता'. 'डीपफेक' सारख्या तंत्रज्ञानामुळे खोट्या बातम्या आणि बनावट व्हिडिओंचा सुळसुळाट झाला आहे, ज्यामुळे सामाजिक शांतता धोक्यात येऊ शकते. जर यंत्रांकडे स्वतःचा विवेक नसेल, तर त्यांनी घेतलेले निर्णय मानवी मूल्यांना धरून असतील का, हा कळीचा प्रश्न आहे.

# राष्ट्रसंताची भजने करावी गाव जागृती!

### कॅलिफोर्निया नगरीत १८ व १९ एप्रिल रोजी भजनाचा जागर

भजने करावी गाव जागृती! हृदय जागृती कार्य जागृती! सर्वांनी लाग:वे सत्कर्मा प्रति!ऐसे लोका सांगावे!!-ग्रामगीता अशा प्रकारचा दिव्य संदेश वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांनी भजन-प्रवाह तिसाव्या अध्यायात सांगितले आहे हे सर्व राष्ट्रसंतानी जनजागृती करण्यासाठीच! संत मीराबाई ही मेवाडच्या राजाची राणी असतांनाच सर्व राजपाट सोडून ती भजने करायला लागली आणि आपल्या कृष्णभक्तीत लिन होवून समाजातील लोकांना भक्ती मार्गाला लावले. तोच भक्तीमार्ग विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात महाकवी राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांनी स्विकारला. आपल्या खंजरी भजनाच्या माध्यमातून जनता जनार्दनाला जागृत करण्याचे महान कार्य त्यांनी केले. भगवान गोपाल कृष्णानी जशी या भुतलावर बासुरीच्या आवाजाने जगाला मोहवून टाकले. त्याचप्रमाणे राष्ट्रसंतांनी स्वतंत्र खंजरी वाद्यांचे संशोधन करुन खंजरी भजनाच्या माध्यमातून जनतेला जागृत करण्याचे काम केले. एवढयावरच न थांबता आपल्या अभिजात मराठी भाषेत चार हजारांहून अधिक मराठी भजने, ओव्या, वृत्त, आरत्या ,पोवाडे, श्लोक लिहिले.त्याच सोबत हिंदी राष्ट्रभाषेत हजारोंच्या संख्येने लहरकी बरखा श्लोक, राष्ट्रीय भजने, हिंदी आरती, राष्ट्रवंदना,आदि लेखन केल्या असून राष्ट्रीय महाकवी वं.राष्ट्रसंतांनी लेखन केले असून त्यांनी स्थापन केलेल्या अखिल भारतीय श्रीगुरुदेव सेवा मंडळाचे वतीने स्वातंत्र्य पुर्व काळात श्रीक्षेत्र वरखेड, अमरावती, नागपूर, चंद्रपूर, गोंदिया, भंडारा जिल्ह्यात भजन संमेलनाचे आयोजन सुध्दा केले. एकदाची गोष्ट सांगतो देश स्वतंत्र होण्यापूर्वी प्रयाग येथे भव्य दिव्य कुंभमेळा भरला होता. कुंभमेळ्यात वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराजांचे खंजरी भजनाच्या कार्यक्रमाचें आयोजन करण्यात आले होते. खंजरी भजनाला महाराष्ट्रातील कर्मयोगी संत गाडगेबाबा यांची सुध्दा उपस्थिती लाभली होती. भजनाचा आरंभी शारदा माई सुमरो गणेशा! टेक! विध्नहरण तेरो सदा भजन, जो गावे सुखको पाई! सदा चरण में ध्यान धरे जो, इहपर लोक माही, कभु दुःख नाही सुमरो!१! म्हणून भजनाला सुरुवात झाली. वंदनीय राष्ट्रसंताचे चौफेर लक्ष राहायचे,तर संतान मध्ये गाडगेबाबा लाखोंच्या संख्येत शेवटी खाली बसलेले होते .तर वंदनीय राष्ट्रसंत माईक मधून गर्जना करीत,संत गाडगेबाबांना आपल्या सेवकांना मंचावर आणायला सांगतात,त्यावर गाडगेबाबा नकार देतात.हे आमच्या महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यातील आजच्या काळातील संत तुकाराम महाराज होय,यावर गाडगेबाबा म्हणतात, कशाला माझा प्रचार करतात?प्रयागच्या कुंभमेळ्यातील साधु,संतांना खऱ्याखुऱ्या संतांचे दर्शन घेता आले पाहिजे म्हणून, सांगतोय. लगेच भजन सुरू होते'गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला 'पूर्ण तीन तास हा कर्मयोगी संत गाडगेबाबा भजनाच्या निनादात रंगून जातात.'लागला रंग भजनाचा,बोलला देव आमुचा! 'हा प्रसंग साहित्यशिरोमणी पूज्य सुदामजी सावरकर यांनी जीवनयोगी ग्रंथात रेखाटला आहे.त्यावेळी भजनसाठी मारोतराव कर्डिकर, दिगंबर हिरपूरकर, रघुनाथ घावट, उदाराम खांबाडकर, मच्छिंद्र चव्हाण, जनार्दन बोथे, सुधाकर



यादव, बाबाराव यादव, बाळासाहेब इंगळे, मनोहर भुते, बाबासाहेब बोके, रामकृष्ण बेलूरकर यांच्या सारखी अनेक भजनीं मंडळी आलटून पालटून राहतं असे.परंतू हे भजन, अभंग, पोवाडे, भक्तीगीत, भावगीत, चित्रपटगीत, लोकगीत, नाट्यगीत, लावणी गीत, बालगीत आजही सर्वंच लोक गातात. त्यावर भजनाचे शिरोमणी वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज भजन लिहतात.'ईश्वर! भजन तुम्हारा, सब लोक गा रहे ! बिरले को पा रहा तू, सबको मिला नहीं है! टेक! या ठिकाणी वंदनीय राष्ट्रसंतांनी तुमच्या माझ्या जीवनाची नाडी परीक्षा करतात.ती कशी, या जगतात संताचीभजने-अभंग सर्वच गातात. परंतू ते विषय वासनेत, सत्तेच्या मोहात,संसाराच्या मोहात फसल्या गेले आहे.त्यातून अजुनही सुटकेचा निःश्वास टाकला नाही.हेच खरे'सब काम में फंसे है,बिरलाद है निकामा! तुकड्या कसे यहाँपे,सब भूल पा रहे है!! खऱ्या अर्थाने ते भजन मीराबाई, मुक्ताबाई, तुलसीदास,कबीरदास, तुकाराम, एकनाथ, नामदेव, गाडगेबाबा यांच्या सारख्या संतांनीचं गाईले आहे.म्हणूनच विसाव्या शतकातील महानब क्रांतिकारक संत राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांनी म्हटले आहे.'दिलं-मनसे गाऊँगा, तेरा भजन!उँचा उठा दे मेरा,प्यारा वतन! टेक!आज ११७वर्ष माऊली वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज यांना या भुतलावर जन्माला झाले.परंतू आजही आमच्या लोकांना कळले नाहीच, 'भजन हे आत्माचे भोजन आहे'राष्ट्रसंत हे भजन गाणारे, कवित्व करणारे संत म्हणून ओळखले जाते.अरे बाबांनो! भजन हे त्यांचे लोक जागृतीचे साधनं होते, लोकांना संघटित करण्याचे साधन होते.खरे राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज हे आध्यात्मिक मानवतावादी राष्ट्रसंत होते, त्यांच्या भजनाने जाती जातीतील,धर्मा धर्मातील, भाषा भाषेतील, प्रांताप्रांतातील लोकांना एकत्रित करुन देश स्वतंत्र करण्यासाठी अहोरात्र काम केले.आणि यांच्या सेवाकार्याची जाणीव संत वृत्तीचे माजी राष्ट्रपती बाबू राजेंद्र प्रसाद यांना झाली.त्यामुळेच राष्ट्रसंताची भजने राष्ट्रपती भवनात, राजघाटावर व सेवाग्रामच्या बापूंच्या कुटीतही झाली.आम्ही राष्ट्रसंताना ओळखू शकलो नाही,आजही काही लोक डफफळीवाला संत म्हणून ओळख देतात.जगाच्या पाठिवर एकमेव या कलियुगातील आधुनिक राष्ट्रसंतांनी भजने, अभंग साहित्यलेखन केले, गावोगावी तरूणांन करीता आखाडे निर्माण केले, व्यायाम मंदिर काढले, गावोगावी सेवा मंडळ स्थापन केले, आदर्श गाव निर्माण केले, जनजागृती करिता श्री गुरूदेव मासिक व साप्ताहिक श्री गुरूदेव सेवक चालविले, श्रीगुरूदेव महिला मंडळाची गावोगावी स्थापना केली ,तरूणांन करीता राष्ट्रधर्म प्रचार वर्ग चालविले अशा प्रकारे रचनात्मक व विधायक कार्यक्रम देश विदेशात राबविले.याची लांबी यादी आहे. दिनांक १ ते ३० एप्रिल २०२६ त्यांचा ग्रामजंयती अभियान महापर्वात त्यांच्या श्री गुरूदेव खंजरी भजन स्पर्धेचे आयोजन शनिवार दिनांक १८ व रविवार दिनांक १९ एप्रिल २०२६ रोजी वरुड कॅलिफोर्निया नगरीत करण्यात आले आहे. त्यानिमित्त सर्व संत महापुरुषांच्या चरणीं भजन सुखार्थ, जन हितार्थ! अवतार दिव्य मेरु तुकयाचा! आडकुनी देवूनी, डफफडीस्तव केले, माणिक बृहस्पती तुकड्याचा विनम्र अभिवादन!



**माणिकदास बेलूरकर**
संत साहित्य अभ्यासक,
श्रीक्षेत्र वरखेड ता.तिवसा
जि.अमरावती
मो.९४२००७६५७३

# समृद्ध वारसा, अस्मिता आणि भविष्यातील आव्हाने

**'लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी, जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी...' सुरेश भटांच्या या ओळी केवळ शब्द नाहीत, तर प्रत्येक मराठी माणसाच्या हृदयाची स्पंदनं आहेत. दरवर्षी २७ फेब्रुवारी हा दिवस आपण 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून मोठ्या उत्साहात साजरा करतो.**

**हा दिवस म्हणजे ज्ञानपीठ पुरस्कार विजेते, श्रेष्ठ कवी विष्णू वामन शिरवाडकर ऊर्फ 'कुसुमाग्रज' यांचा जन्मदिवस. कुसुमाग्रजांनी आपल्या लेखणीतून मराठी साहित्याला एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवले, म्हणूनच त्यांचा जन्मदिवस मराठी भाषेचा सन्मान करण्याचा दिवस म्हणून निवडला गेला.**

**ऐतिहासिक वारसा आणि साहित्याची श्रीमंती**

मराठी भाषा ही केवळ संवादाचे माध्यम नसून ती एका संस्कृतीचा श्वास आहे. सातवाहन काळापासून ते आजच्या डिजिटल युगापर्यंत मराठीचा प्रवास अत्यंत देदीप्यमान राहिला आहे. संत ज्ञानेश्वरांनी 'माझा मराठाचि बोलु कौतुकें। परी अमृतातेहि पैजा जिंके...' असे म्हणत मराठीची गोडी अमृतापेक्षाही श्रेष्ठ असल्याचे सिद्ध केले. वारकरी संप्रदायातील संतांनी अभंगवाणीतून मराठी घराघरांत पोहोचवली, तर छत्रपती शिवाजी महाराजांनी 'राज्यव्यवहार कोशा'च्या माध्यमातून मराठीला प्रशासकीय प्रतिष्ठा मिळवून दिली. मराठी साहित्यातही विविधता आहे. महानुभाव पंथाचे ग्रंथ असोत, समर्थ रामदासांचे 'दासबोध' असोत, किंवा आधुनिक काळातील पु.ल. देशपांडे, व.पु. काळे आणि भालचंद्र नेमाडे यांचे साहित्य असो; मराठीने प्रत्येक पिढीला वैचारिक खाद्य पुरवले आहे.

**मराठीची सद्यस्थिती आणि जागतिकीकरण**

आजच्या जागतिकीकरणाच्या युगात इंग्रजी भाषेचे आक्रमण वाढत असताना, मराठी भाषेच्या अस्तित्वावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाते. मात्र, वास्तव हे आहे की मराठी ही जगातील सर्वाधिक बोलल्या जाणाऱ्या भाषांपैकी १५ व्या क्रमांकावर आहे. तंत्रज्ञानाच्या काळात मराठी मागे पडलेली नाही. आज इंटरनेट, सोशल मीडिया आणि विविध सॉफ्टवेअर्समध्ये मराठीचा




वापर मोठ्या प्रमाणावर होत आहे. गुगलपासून ते विकिपीडियापर्यंत सर्वच ठिकाणी मराठी दिमाखात वावरत आहे.

**अभिजात दर्जाची प्रतीक्षा आणि गरज**

मराठी भाषेला 'अभिजात भाषेचा' दर्जा मिळावा, ही महाराष्ट्राची जुनी मागणी आहे. मराठीमध्ये २ हजार वर्षांहून जुना इतिहास, स्वयंभू साहित्य आणि प्राचीन परंपरा आहेत. अभिजात दर्जा मिळाल्यास भाषेच्या संशोधनासाठी आणि प्रसारासाठी केंद्र सरकारकडून मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध होईल, ज्यामुळे मराठीचा जागतिक स्तरावर अधिक प्रसार होण्यास मदत होईल.

**आव्हाने आणि आपली जबाबदारी**

मराठी भाषा केवळ 'साजरी' करून चालणार नाही, तर ती 'वापरली' पाहिजे. आजची तरुण पिढी इंग्रजी माध्यमाकडे वळत असताना मराठी भाषेचे वाचन कमी होत आहे की काय, अशी भीती वाटते. मराठी टिकवण्यासाठी खालील गोष्टी करणे आवश्यक आहे:

**दैनंदिन वापर:** आपण आपल्या व्यवहारात शक्य तिथे मराठीचा आग्रह धरला पाहिजे.

**वाचन संस्कृती:** नवीन पिढीला मराठी कथा, कविता आणि कादंबऱ्यांची गोडी लावली पाहिजे.

**डिजिटल उपस्थिती:** मराठी भाषेत जास्तीत जास्त ज्ञान, ब्लॉग्स आणि शैक्षणिक माहिती इंटरनेटवर उपलब्ध करून दिली पाहिजे.

**अभिमान बाळगणे:** मराठी बोलताना न्यूनगंड न बाळगता सार्थ अभिमान बाळगायला हवा.

मराठी भाषा ही लवचिक आहे. तिने अनेक परकीय शब्द स्वतःमध्ये सामावून घेतले आणि अधिक समृद्ध झाली. 'मराठी भाषा गौरव दिन' हा केवळ एक दिवसाचा सोहळा न राहता, तो मराठी जपण्याचा एक संकल्प असायला हवा. कुसुमाग्रजांच्या स्वप्नातील समृद्ध आणि ज्ञानसंपन्न मराठी घडवण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करायला हवेत. आपण मराठीत बोलूया, मराठीत लिहूया आणि मराठी संस्कृतीचा वारसा अभिमानाने पुढे नेऊया. कारण जोपर्यंत मराठी टिकेल, तोपर्यंत आपली अस्मिता टिकेल!

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# चुडामनी नदीतून पाणी सोडण्यास विलंब का?

## परिसरातील शेतकरी व नागरिकांचा सिंचन विभागाला सवाल

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – पाणीटंचाईचा दाह कमी करण्यासाठी नागठाणा धरणाचे पाणी चुडामनी नदीत सोडल्या जाते. यामुळे नदीकाठच्या विहिरी व पाणी पुरवठ्याचे स्रोत पुनर्जीवित होतात. यावर्षी पाणी सोडण्यास विलंब झाल्यामुळे पाणीटंचाईचा दाह वाढला आहे. यामुळे धरणाचे पाणी चुडामनी नदीत सोडण्याची मागणी नागरिकांची आहे. चुडामनी नदीच्या उगमस्थ ानाजवळ नागठाणा १ व नागठाणा २ धरणे बांधण्यात आली. उगमस्थाना पासून वरुड, अमडापूर, राजुरा बाजार, वाडेगाव, काटी, गाडेगाव, वघाळ या गावा दरम्यान कोल्हापुरी पद्धतीचे बंधारे, साठवण बंधारे, नदी खोलीकरण करण्यात आले. धरणाचे पाणी नदीत प्रवाहित केल्यास हे बंधारे पाण्याने भरले जातात. यामुळे पाण्याची पातळी वाढून पाणीटंचाईचा दाह कमी होतो.

### लोकप्रतिनिधींना काही देणेघेणे नाही

“ सगळीकडे पाणीटंचाई आहे. जनतेला पाणी हवे. प्रत्येकवर्षी रुटीन पद्धतीने कामे करावी लागतात. मार्च एप्रिल महिन्यात पाणी सुटणे अगत्याचे होते. पाणी सोडण्यात अनियमितता होऊ नये.

### पाणी सोडण्याची परंपरा

“ यावर्षी प्रकल्पात पुरेसा जलसाठा आहे. तरीही पाणी सोडण्यास विलंब का असा प्रश्न उपस्थित होत आहे. पूर्वीपासून चालत आलेली परंपरा सिंचन विभाग व लोकप्रतिनिधींना पडली का असा प्रश्न उपस्थित होत आहे

# अनधिकृत प्रवासी वाहतुकीवर कारवाई सुरु

## वाढत्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर परिवहन विभाग सक्रिय

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***मुंबई*** :– अनधिकृतपणे प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर धडक कारवाई करण्याची मोहीम परिवहन विभागाने हाती घेतली आहे. राज्यात गेले काही दिवसांत झालेल्या गंभीर अपघातांमुळे प्रशासन सक्रिय झाले आहे. या कारवाईमुळे प्रवाशांचा प्रवास सुरक्षित होण्यास मदत होणार आहे.

कल्याण–मुरबाड महामार्गावर रायते गावाच्या हद्दीत भीषण अपघात झाला होता. कल्याणकडून अनधिकृतपणे प्रवासी वाहतूक करणाऱ्या टॅक्सी आणि मिक्सरची धडक झाली. या अपघातात चारचाकी वाहनातील ११ प्रवाशांचा मृत्यू झाला.

विविध ठिकाणी तपासणी नाके या घटनेनंतर राज्यभरातील प्रादेशिक परिवहन कार्यालय (आरटीओ) आणि वाहतूक पोलिसांच्या संयुक्त पथकांकडून विविध ठिकाणी तपासणी नाके उभारण्यात आले आहेत. यामध्ये परवान्याविना धावणारी प्रवासी वाहने, अवजड वाहनांद्वारे नियमभंग, तसेच क्षमतेपेक्षा जास्त प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांची तपासणी करण्यात येत आहे. मुंबई शहर आणि उपनगरामध्ये शेअर टॅक्सी, रिक्षामधून अनधिकृतपणे वाहतूक होत आहे.

## संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातून

# दिनेश चांडक यांना प्रतिष्ठित आचार्य पदवी प्रदान

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



***हिवरखेड*** – व्ही.वाय.डब्ल्यू.एस.च्या प्रा.राम मेघे अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालय, बडनेरा, अमरावती येथील प्राध्यापक दिनेश संतोष चांडक यांना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांच्याकडून इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन अभियांत्रिकी विषयात डॉक्टरेट पदवी प्रदान करण्यात आली आहे.

त्यांचा डेव्हलपमेंट ऑफ अँन ईफीसिएंट मेथड फॉर आयडेंटिफीकेशन ऑफ रिजनल क्रॉप डिसीज बेसड ऑन पॅरामिटर टयुनिंग ऑफ लिव्हज : अ मेडिसिन लर्निंग अप्रोच या विषयावरील प्रबंध प्रा.राम मेघे अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालय, बडनेरा, अमरावती येथील संशोधन केंद्रात डॉ.काश्मिरा कसाट यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करण्यात आला. दिनेश यांनी डॉ.काश्मिरा कसाट यांचे मोलाचे मार्गदर्शन, डॉ.निलेश एन.कसाट यांचे मार्गदर्शन व सहकार्य तसेच प्राचार्य डॉ.अजय ठाकरे यांचे संस्थात्मक पाठबळ याबद्दल मनःपूर्वक आभार व्यक्त केले आहेत. सध्या प्रा.राम मेघे अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयात कार्यरत असताना, ते प्राचार्य डॉ.ए.पी.ठाकरे आणि विभागप्रमुख डॉ.खोडके यांच्या नेतृत्वाखाली कार्य करत असून, त्यांच्या प्रोत्साहनाबद्दल त्यांनी विशेष आभार मानले आहेत. तसेच त्यांनी व्ही.वाय.डब्ल्यू.एस.व्यवस्थापनाचे अध्यक्ष डॉ.नितीन धांडे, उपाध्यक्ष अॅड.उदय देशमुख, कोषाध्यक्ष प्रा.हेमंत देशमुख, सचिव युवराजसिंग चौधरी, कार्यकारी सदस्य डॉ.पूनम चौधरी, पंकज देशमुख, प्रा.विनय गोहाड आणि प्रा.गजानन काले यांचेही आभार व्यक्त केले आहेत.

याशिवाय, त्यांनी वडील संतोषकुमार चांडक, सुधादेवी चांडक, पत्नी चेतना, राहुल राठी, उमेश गांधी, अक्षय गांधी, पश्चिम विदर्भातील सर्व शेतकरी बंधू-भगिनी आणि प्रा. राम मेघे अभियांत्रिकी व व्यवस्थापन महाविद्यालयातील सर्व शैक्षणिक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांचे आभार मानले आहेत.

# नाशिक आणि परतवाडा अत्याचार प्रकरण आरोपींना फाशी द्या

## वरुडमध्ये सर्वपक्षीय महिला व अकॉर्ड फाऊंडेशनचे निवेदन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** - नाशिक येथील आरोपी अशोक खरात आणि परतवाडा येथील आरोपी अयान अहमद यांनी महिलांवर केलेल्या लैंगिक अत्याचारामुळे संपुर्ण परिसरात संतापाची लाट उसळली आहे. या दोन्ही नराधम आरोपींना कठोर शिक्षा करुन तात्काळ फाशी देण्यात यावी, या मागणीसाठी 'अकॉर्ड फाउंडेशन' आणि सर्वपक्षीय महिला यांच्यावतीने पोलीस स्टेशन येथे पोलीस निरीक्षकांना निवेदन देण्यात आले.

नाशिक आणि परतवाडा येथे झालेल्या या घटनांनी महिला सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. महिलांवरील वाढते अत्याचार रोखण्यासाठी प्रशासनाने कठोर पावले उचलणे गरजेचे असल्याचे मत यावेळी व्यक्त करण्यात आले. या निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली की, या दोन्ही प्रकरणांचा तपास जलदगतीने करुन आरोपींना कठोरात कठोर शिक्षा देण्यात यावी, जेणेकरुन भविष्यात अशा घटनांना आळा बसेल. निवेदन देतेवेळी यांची होती उपस्थिती: या आंदोलनाचे नेतृत्व आणि उपस्थितीमध्ये जमीर पटेल, नगरसेविका मनीषा उईके, सविता काळे, वसीम शेख, जावेद खान, तौसीफ खान (उर्फ भुरा भाई), अभिजीत सिंह चौहान, रसिका बरडे, लीना जगदीश शिरभाते, दीप्ती एकनाथ शेरेकर, दुर्गा निलेश काशकर, संगीता महल धुवावीया यांच्यासह अनेक सामाजिक कार्यकर्ते व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## जायंट्स ग्रुप ऑफ वरुड तर्फे

# डॉ.बाबासाहेबांच्या जयंतीनिमित्त शोभायात्रेत शरबत वाटप

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**वरुड** – भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त वरुड शहरात काढण्यात आलेल्या भव्य शोभायात्रेमध्ये 'जायंट्स ग्रुप ऑफ वरुड'च्या वतीने सामाजिक बांधिलकी जपत अभिवादन करण्यात आले. रणरणत्या उन्हाची तमा न बाळगता शोभायात्रेत सहभागी झालेल्या हजारो अनुयायांसाठी ग्रुपतर्फे थंडगार शरबत वाटपाचा उपक्रम राबविण्यात आला. शहराती मुख्य मार्गावरून निघालेल्या या मिरवणुकीत अबालवृद्धांचा मोठा सहभाग होता. कडक उन्हामुळे होणारा त्रास लक्षात घेता जायंट्स ग्रुपच्या सदस्यांनी ठिकठिकाणी थांबून अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने सर्वांना शरबत वाटप केले.

यावेळी जायंट्स ग्रुप ऑफ वरुडचे अध्यक्ष, पदाधिकारी आणि सर्व सन्माननीय सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. 'महामानवाच्या विचारांना अभिवादन करण्यासोबतच, या ऐतिहासिक सोहळ्यात सहभागी झालेल्या भीम अनुयायांची सेवा करण्याची संधी मिळावी या उद्देशाने हा उपक्रम राबवण्यात आला,' अशी भावना ग्रुपच्या वतीने व्यक्त करण्यात आली.

या स्तुत्य उपक्रमाचे शहरात सर्वत्र कौतुक होत असून, सामाजिक सलोखा जपण्याचे कार्य जायंट्स ग्रुप सातत्याने करत असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.

या कार्यक्रमाला उपस्थित सर्व जायंट्स ग्रुपचे पदाधिकारी डॉ.आर.बी.खवले, अध्यक्ष विजय गुल्हाने, उपाध्यक्ष भागवत आंडे, उपाध्यक्ष डॉ.भूषण खोले, सचिव धनराज मानकर, माजी अध्यक्ष नितीन खेरडे, कोषाध्यक्ष महेश बोरकुटे, पीआरओ लीलाधर सुपले, सभासद देविदास कोहळे , हरिहर वरुडकर, सचिन परिहार, भारत खासबागे, किशोर गुल्हाने, किशोर तडस, जायंट्स ग्रुपचे माजी अध्यक्ष तारेश देशमुख, श्रीधर सोमकुवर, नितीन खेरडे, नरेंद्र काळे, विकास ठाकरे, वरुडचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष इंजि.ईश्वर सलामे,बांधकाम समिती सभापती जीवन मालपे, नगरसेवक संदीप देवते, जमीर पटेल इत्यादी उपस्थित होते.

# जनता इंग्लिश स्कूलमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**शेंदुरजनाघाट** – जनता इंग्लिश स्कूलमध्ये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.


या कार्यक्रमाचे आयोजन शाळेच्या मुख्याध्यापिका आंडे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी आंबेडकर यांच्या जीवनकार्यावर भाषणे केली तसेच त्यांच्या विचारांचे महत्त्व पटवुन दिले.

या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची जाणीव निर्माण झाली. कार्यक्रम यशस्विपणे पार पडला. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

# अखेर 'त्या' श्वानाला पकडून नगरपरिषदेने केले हददपार

## नागरिकांच्या तक्रारीनंतर मुख्याधिकारी गजानन भोयर यांची तत्परता

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**वरुड** – शहरातील मोठा भाजी बाजार परिसरातील एका पाळीव श्वानाने अनेक नागरिकांना चावा घेतल्याची तक्रार नागरीकांनी नगरपरीषद प्रशासनाकडे केली होती. याबाबत माध्यमांनी सुद्धा वृत्त प्रकाशित केले होते. या वृत्ताची दखल घेत कर्तव्यदक्ष मुख्याधिकाऱ्यांचे आदेशान्वये नगरपरीषदेच्या रेस्कीव टिमने त्या श्वानाला पकडुन नेल्याने परीसरातील महिलांनी वरुड नगरपरीषद प्रशासनाचे आभार मानले.

प्राप्त माहितीनुसार, गेल्या काही वर्षापासून मोठा भाजी बाजार परीसरातील दिलीप नथ्थुजी पाटणकर यांनी एक श्वान पाळलेले होते. त्या श्वानाने गेल्या ६ महिण्याच्या कालावधीत परीसरातील अनेक लहान मुले व नागरीकांना चावा घेउन जखमी केल्याच्या घटना समोर आल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. या श्वानामुळे परीसरातील महिला, पुरुष तसेच लहान मुलांच्या जीवाला धोका निर्माण झाल्याने नागरिकांमध्ये प्रचंड संताप व्यक्त केला जात होता. या संदर्भात परिसरातील नागरीकांनी नगरपरीषदेचे मुख्याधिकारी यांना लेखी तक्रार देऊन त्या श्वानाचा त्वरीत बंदोबस्त करण्याची मागणी केली होती. या घटनेची मध्यमांनी सुद्धा दखल घेत वृत्त प्रकाशित केले.

या वृत्ताची नगरपरिषदेचे कतर्व्यदक्ष मुख्याधिकारी गजानन भोयर, आरोग्य निरीक्षक सुरेंद्र चोचमकर यांनी गांभीर्याने दखल घेत श्वान मालकाला नोटीस बजावून वरूड नगरपरिषद प्रशासनाच्या रेस्कीव टिम ने आरोग्य निरीक्षक सुरेंद्र चोचमकर यांचे मार्गदर्शनाखाली मोठा भाजी बाजार परीसर गाठले आणी त्या श्वानाला पकडुन नेल्याने परीसरातील महिला, पुरुष व चिमुकल्या बाल गोपालांनी सुटकेचा निःश्वास सोडला. नगरपरिषदेच्या या तत्परतेचे वरुड नगरपरिषद प्रशासनाचे सुद्धा आभार मानले.

# भोंदु साधु पासुन महिला व पुरुषांनी सावध राहावे

## अंनिस अध्यक्ष तथा माजी तहसीलदार कमलाकर देशमुख यांचे आवाहन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – सद्य: सर्वत्र भोंदूबाबा आणि भोंदू साधूंचे प्रस्थ मोठ्या प्रमाणावर वाढत असून, त्यांच्या भुलथापांना बळी पडू नका, असे आवाहन अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अंनिस अध्यक्ष तथा माजी तहसीलदार कमलाकर देशमुख यांनी केले आहे.

या भोंदू लोकांमुळे अनेक महिला व पुरुषांचे शारीरिक, मानसिक तसेच आर्थिक नुकसान होत आहे. सुशिक्षित लोकही त्यांच्या जाळ्यात अडकून स्वतःची फसवणूक करून घेत आहेत. हे भोंदू बाबा आपल्या रसाळ आणि गोड भाषेने लोकांना आकर्षित करतात, ज्यामुळे आपली फसवणुक होत आहे हे देखील सामान्यांच्या लक्षात येत नाही. या संदर्भात अधिक माहिती देताना देशमुख म्हणाले की, 'महाराष्ट्रात जादूटोणा विरोधी कायदा अस्तित्वात आहे. आमचा विरोध देव किंवा धर्माला नसून, देवाच्या नावावर सर्वसामान्यांची लूट करणाऱ्या प्रवृत्तीला आहे.'जर कोणाला अशा प्रकारच्या फसवणुकीचा संशय आल्यास किंवा अनुभव आल्यास त्यांनी त्वरित जवळच्या पोलीस स्टेशनशी किंवा अंधश्रद्धा निर्मूलन समितीशी संपर्क साधावा, असे कळकळीचे आवाहनही त्यांनी केले आहे.

# नो-पार्किंगमध्ये थर्मो प्लास्टिकचा रंग; इचउ च्या वाहनतळात वाहन पार्किंग करा : बेकायदा पार्किंगची समस्या दूर करण्यासाठी निर्णय

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई –** गेल्या काही वर्षांत मुंबईतील पार्किंगची समस्या अधिक गंभीर होत आहे. मुंबई महापालिकेची सार्वजनिक वाहनतळ असतानाही नो-पार्किंग झोनमध्ये गाडी पार्क केली जाते. मुंबईतील बेकायदा पार्किंगची समस्या दूर करण्यासाठी आता नो-पार्किंग झोन क्षेत्रात थर्मो प्लास्टिकचा रंग लावण्यात येणार आहे. नो-पार्किंगच्या फलकाची संख्या वाढवण्यात येणार आहे. यामुळे मुंबई महापालिकेच्या वाहनतळाकडे मुंबईकर वाहन पार्किंग करतील आणि हळुवार अनधिकृत पार्किंगची समस्या दूर होईल, असा विश्वास मुंबई महापालिका प्रशासनाने व्यक्त केला आहे. दादर पश्चिम येथील जे. के. सावंत मार्गांवर कोहिनूर गल्लीत मुंबई महापालिकेचे पार्किंग झोन आहे. मात्र, वाहनधारक अधिकृत पार्किंग झोनमध्ये गाडी उभी न करता रस्त्यावरच उभी करतात. यामुळे रस्त्यावरील वाहतूककोंडी वाढते आणि सगळ्यांनाच त्रास सहन करावा लागतो. यावर मुंबई महापालिकेच्या वाहतूक विभागाने तोडगा काढला आहे. पार्किंग झोन असलेल्या आजूबाजूच्या परिसरात नो-पार्किंग फलकांची संख्या आणखी वाढवण्यात येणार आहे. थर्मो प्लास्टिकचा रंग, नो पार्किंग फलकाच्या संख्येत वाढ करणे, यामुळे मुंबई महापालिकेच्या सार्वजनिक वाहनतळाकडे वाहनचालक आपसूकच येतील.

### क्रांतीज्योती ब्रिगेड वरुड शाखेच्या वतीने आयोजीत

# रोगनिदान शिबिरात १४३ नागरिकांचा सहभाग

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड –** सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या क्रांतीज्योती ब्रिगेड वरूड शाखेच्या वतीने स्थानिक श्री संत सावता महाराज मंदिर येथे भव्य रोगनिदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

महात्मा फुले चौक येथे महात्मा फुले यांच्या पुतळ्याला हारार्पण, प्रसाद वाटप करुन अभिवादन संघटनेच्या असंख्य सदस्यांच्या उपस्थितीत करण्यात आले तसेच या शिबिरामध्ये एकूण १४३ रुग्णांनी आरोग्य तपासणी करून शिबिराचा लाभ घेतला.






रुग्णांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळावी, या उद्देशाने आयोजित या शिबिरात डॉ.सौरभ आंडे, डॉ.सागर वसुले, डॉ.ऋतुज नेरकर, डॉ. मीना बंदे आणि डॉ.मिलिंद खेरडे या तज्ज्ञ डॉक्टरांनी आपली सेवा दिली. त्यांनी रुग्णांची बारकाईने तपासणी करुन त्यांना काही प्रमाणात औषधी सुद्धा मोफत देण्यात आली तसेच बी.पी.व शुगर फ्री मध्ये चेक करुन देऊन पुढील उपचारांबाबत मार्गदर्शन केले.

याप्रसंगी निधी प्रभाकर बोडखे या चिमुकलीचने उत्तम असे भाषण दिले. उदघाटक म्हणुन आमदार चंदु उर्फ उमेश यावलकर यांनी आयोजकांशी संवाद साधून कार्यक्रमाला शुभेच्छा दिल्या तसेच क्रांतीज्योती ब्रिगेडचे संस्थापक अध्यक्ष नंदेश अंबाडकर यांनीही कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सदिच्छा व्यक्त केल्या. याप्रसंगी श्यामाप्रसाद महाविद्यालयाचे प्राचार्य रामदास फुलारी, माजी प्राचार्य पुरुषोत्तम कळमकर, प्राचार्य किशोर तडस ,पत्रकार दीपक खंडेलवाल, शिक्षक प्रदीप गणोरकर, मुख्याध्यापक नितीन ठाकरे, पहाट पक्षी मित्र मंडळाचे हंगामी अध्यक्ष हिरामन आंडे यांच्यासह शहरातील अनेक गणमान्य नागरिकांनी शिबिराला भेट दिली. यशस्वितेसाठी क्रांतीज्योती ब्रिगेडच्या वरुड शहर व तालुक्यातील अशोक देवते, विनय चौधरी, किशोर तडस, बाबाराव फरकाडे, सुकांत यावले, सुभाष राऊत, विनोद भेलकर, नितीन गंनगणे, संजय पवार, राजू धुमटकर, सतीश फरकाडे, अमोल खासबागे यांचेसह महिला पदाधिकाऱ्यांमध्ये डॉ.मीना बंदे, माजी नगराध्यक्ष जया नेरकर, हिमानी आजनकर, जयश्री फुटाणे, निशा गणोरकर, वैशाली शिंगरवाडे, शोभा राऊत, जयश्री खासबागे, उषाताई चौधरी, वनिता चौधरी सह सर्व पदाधिकारी आणि महिला-पुरुष सदस्यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे संचालन व आभार संजय पवार यांनी मानले. श्री संत सावता मंदिर समितीच्या पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या विशेष सहकार्याबद्दल संघटनेच्या वतीने त्यांचे आभार मानण्यात आले.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्रीमती जे.एस.ठाकरे, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.३२७/२०२६** **ने.ता.०८/०६/२०२६**

**अर्जदार :-** १) चंद्रकला मोहनराव वसुले, वय अं.६० वर्ष, धंदा-घरकाम, रा.माता चौक, शेंदुरजनाघाट, ता.वरुड, २) पुजा स्वप्निल बोंडे, वय अं.३८ वर्ष, धंदा- घरकाम, रा.सालोड, ता.सालोड, जि.वर्धा, ३) पुनम शरद गुजर, वय अं.३६ वर्ष, धंदा-घरकाम, रा.आष्टी, ता.आष्टी, जि.वर्धा

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत मोहन भाऊराव वसुले, रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०८/०६/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१८/०४/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# मला पहिल्यापासून वेगळी वागणूक, एकनाथ शिंदेंच्या सभेचं निमंत्रणही नाही...: शिंदे गटाचे आमदार महेश शिंदेंनी सगळं सांगितलं, साताऱ्यातील अंतर्गत नाराजी उफाळणार?

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**सातारा –** साताऱ्यात होणाऱ्या उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सभेचं निमंत्रण मला मिळालं नाही. त्यामुळे मी या कार्यक्रमाला येणार नाही. असं स्पष्टीकरण कोरेगावचे आमदार महेश शिंदे यांनी दिलं आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराजे देसाई हे मला पहिल्यापासून वेगळी वागणूक देतायत. कोणत्याही कार्यक्रमांना मला बोलावलं जात नाही. असा थेट आरोप देखील आमदार महेश शिंदे यांनी केला आहे. कोरेगावमध्ये शिवसेना आणि भाजपची युती होती. २०१९ मध्ये देवेंद्र फडणवीस यांनी मला शिवसेनेच्या चिन्हावर लढायला सांगितले, त्यामुळे मी शिवसेनेतून लढलो. हे सांगायला देखील महेश शिंदे विसरले नाहीत. परिणामी आता साताऱ्यातील अंतर्गत नाराजी अधिक उफाळणार असल्याचे चिन्ह आहे. तर दुसरीकडे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आजच्या कार्यक्रमात महेश शिंदे व्यासपीठावर दिसणार का? ते कार्यक्रमात हजेरी लावणार का? की साताऱ्यातील अंतर्गत नाराजी आणखी तीव्र होणार? याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. साताऱ्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा नागरी सत्कार, महेश शिंदे व्यासपीठावर दिसणार का?

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील**
**श्री.आय.जे.ठाकरे, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर )**
**वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.३२८/२०२६** **ने.ता.१९/०६/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती ललिता किशोर कोंडुलकर, वय अं.५५ वर्ष, धंदा-घरकाम, २) सौ.नम्रता अमित पातुरकर, वय अं.३५ वर्ष, धंदा- घरकाम, रा.राधाकृष्ण नगर, पुणे, ता.जि.पुणे, ३) प्रणव किशोर कोंडुलकर, वय अं.२३ वर्ष, धंदा-शिक्षण, क्र.१ व ३ रा.पोस्ट ऑफिस जवळ, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत किशोर मारोतराव कोंडुलकर, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१९/०६/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **१८/०४/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

### तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय

**क्र.प्रस्तु-१/कावी-५४/२०२६** **दि.०६/०४/२०२६**

**जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **प्रणिता ज्ञानेश्वरराव अनवाने, रा.पेठ मांगरुळी, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **ग्रामपंचायत पेठ मांगरुळी, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **वडील नामे ज्ञानेश्वर नारायणराव अनवाने, रा.पेठ मांगरुळी, ता.वरुड, जि.अमरावती, यांचे मृत्यु दि.१९/०८/२०१८** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म-मृत्यू चे नोंद घ्यावी या करीता सदरहू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज रोजी **०६/०४/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार**
**वरुड**

## जाहीर नोटीस

### तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय

**क्र.प्रस्तु-१/कावी-११५/२०२६** **दि.२०/०४/२०२६**

**जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **संदेश उकंडकराव आकोटकर, रा.कुरळी, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **ग्रामपंचायत कुरळी, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **बहीण नामे संजीवनी उकंडराव आकोटकर, रा.कुरळी, ता.वरुड, जि.अमरावती, यांचे जन्म दि.०९/१०/१९७७** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म-मृत्यू चे नोंद घ्यावी या करीता सदरहू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज रोजी **२०/०४/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार**
**वरुड**

## जाहीर नोटीस

### तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय

**क्र.प्रस्तु-१/कावी-१०४/२०२६** **दि.१६/०४/२०२६**

**जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **श्री संजय जगदीश गावंडे, रा.रोषणखेडा, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **ग्रामपंचायत रोषणखेडा, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म-मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **स्वत: नामे संजय जगदीश गावंडे, रा.रोषणखेडा, ता.वरुड, जि.अमरावती, यांचे जन्म दि.२७/१०/१९९१** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म-मृत्यू चे नोंद घ्यावी या करीता सदरहू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज रोजी **१६/०४/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार**
**वरुड**

## दिनविशेष

2008 - इंडी कार शर्यत जिंकणारी डॅनिका पॅट्रिक पहिली महिला चालक ठरली

## सोने-चांदीचे दर

शुध्द सोने -९६१०८१० रु.(१०ग्रॅम)
२२.कॅ सोने - ९४,७०० रु.(१०ग्रॅम)
चांदी - १,३०,००० रु. (प्र.किलो)

## कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती

बाजारभाव ( क्विंटलमध्ये )

| | | |
|---|---|---|
| ज्वारी | १६५० | २००० |
| गहू | २५०० | ३००० |
| तूर | ६१०० | ६३९० |
| मूग | ६५०० | ७००० |
| उडीद | ६००० | ७००० |
| हरभरा | ५६०० | ५९०० |
| सोयाबिन | ४१०० | ४३५० |
| बाजरा | २००० | २३०० |
| तिळ | ८२०० | ९३०० |
| भुईमूग | ५१५० | ५३५० |
| मका | २२०० | २३०० |

# 'हा वाद माझ्या आटोक्याबाहेर'

### चंद्रपुरातील मुनगंटीवार-जोरगेवार वादासमोर भाजप प्रदेशाध्यक्षांनी टेकले हात, आता थेट दिल्लीतून होणार फैसला



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**चंद्रपूर** - भाजपमधील गटबाजी आणि अंतर्गत वाद आता शिगेला पोहोचला असून, दिग्गज नेते सुधीर मुनगंटीवार आणि किशोर जोरगेवार यांच्यातील संघर्ष सोडवण्यात प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनीही आपली हतबलता व्यक्त केल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांकडून मिळत आहे. असे संकेत चव्हाणांनी नागपुरातील भेटीत दिल्याने राजकीय वतुर्ळात खळबळ उडाली आहे. चंद्रपूर महानगरपालिकेतील पराभवाचे पडसाद नुकत्याच पार पडलेल्या चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या झोन समिती आणि महिला बालकल्याण समितीच्या निवडणुकांमध्ये भाजपला मोठा धक्का बसला. संख्याबळ अनुकूल असतानाही मुनगंटीवार-जोरगेवार वादामुळे भाजपला पराभवाचा सामना करावा लागला. या पार्श्वभूमीवर आमदार किशोर जोरगेवार यांनी शुक्रवारी संध्याकाळी नागपूर गाठून १७ समर्थक नगरसेवकांसह प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांची भेट घेतली.

# आरटीई तक्रारीनंतर पंचायत समिती ॲक्शन मोडवर

### चौकशीला सुरुवात : गटशिक्षणाधिकारी यांची तत्परता

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** - तालुक्यातील आरटीई (शिक्षणाचा हक्क) प्रवेश प्रक्रियेबाबत प्राप्त झालेल्या तक्रारीची पंचायत समितीने तात्काळ दखल घेत कारवाईला सुरुवात केली आहे. संबंधित पालकांनी प्रवेश प्रक्रियेत अनियमितता होत असल्याची तक्रार पंचायत समितीकडे केली होती. या तक्रारीनंतर प्रशासनाने तातडीने हालचाली करत प्रकरणाची चौकशी सुरु केली.

तालुक्यामध्ये आरटीई २०२६-२७ ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया कागदपत्रे पडताळणीला सुरुवात झाली असून प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक राबविण्यात येत आहे. आरटीई प्रवेश प्रक्रिया फॉर्म भरणे ते निवड प्रक्रिया यामध्ये पालक ते निवड समिती पुणे यांच्यामध्ये कोणीही मध्यस्थी नसतो.

निवड झाल्याचे मेसेज पालकांच्या मोबाईलवर प्राप्त होतात. त्यामुळे यामध्ये गटशिक्षणाधिकारी कार्यालयाचा संबंध येत नाही. कागदपत्रे पडताळणी प्रक्रियेच्या टप्प्यावर गटशिक्षणाधिकारी



कार्यालय यामध्ये सहभागी असते.

वरुड तालुक्यामध्ये प्रथमच भाडेपट्टे खोटे करण्यात आले आहेत, अशा स्वरुपाच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

तक्रारकर्ते प्रविण गाडबैल, सचिन घाटोळे तथा उपस्थित शैलेश देशमुख, अनिल गावंडे, देवेंद्र लुंगे, विनोद सूर्यवंशी, मनिष धनुस्कर, रुपाली कासे, प्रफुल्ल काळके, प्रवीण गाडेवाल यांच्यासह अन्य लोकांच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्या अनुषंगाने भाडेपट्टे करार खरे आहे की खोटे? त्याची चौकशी गटशिक्षणाधिकारी विनोद गाढे यांनी करण्याचे आदेश दिले.

त्या अनुषंगाने विस्तार अधिकारी शरद कुकडे, सुनील राठोड व श्री भगवंत गजभिये केंद्रप्रमुख यांच्या अध्यक्षतेखाली तीन पथके गठित करण्यात आले असून भाडेपट्ट्याची प्रत्यक्ष तपासणी करायला सुरुवात झाली आहे. आज रोजी गटशिक्षणाधिकारी विनोद गाढे व सर्व पथके यांनी भाडेपट्ट्यांची कसून चौकशी करण्यास सकाळी ७ वाजता पासुन सुरुवात केली आहे. प्रत्यक्ष तपासणी पुर्ण होण्याला अजून काही दिवस लागणार आहेत.

पंचायत समितीच्या शिक्षण विभागाने संबंधित शाळा व अधिकाऱ्यांकडून माहिती मागवली असून, संपूर्ण प्रक्रियेची पडताळणी केली जात आहे. तसेच, दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा प्रशासनाकडून देण्यात आला आहे.



"आरटीई संदर्भात पंचायत समितीकडे तक्रार प्राप्त झाल्याने पंचायत समिती शिक्षण विभागाने यासंदर्भात तातडीने पडताळणी करण्याचे आदेश दिले आहेत.

भाडे करार खोटे असल्यास योग्य ती प्रशासकीय कार्यवाही करण्यात येईल, अशी प्रतिक्रिया पं.स. गटशिक्षणाधिकारी विनोद गाढे यांनी दिली आहे.

दरम्यान, या प्रकरणामुळे पालकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, पंचायत समितीच्या त्वरित हस्तक्षेपामुळे पालकांना दिलासा मिळाला आहे. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा हक्क अबाधित राखण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचेही अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले. या प्रकरणाचा अहवाल लवकरच सादर करण्यात येणार असून, पुढील कारवाई त्यानुसार केली जाणार आहे.

# अनैसर्गिक संबंधांसाठी नांदेड पोलीस अधीक्षक कार्यालयातील लिपिकाचा तगादा, सततच्या त्रासाला कंटाळून २४ वर्षीय तरुणाने संपवलं आयुष्य

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**कळमनुरी** - हिंगोलीच्या कळमनुरी तालुक्यात एका तरुणाला अनैसर्गिक संबंध ठेवण्यासाठी तगादा लावण्याच्या त्रासाला कंटाळून २४ वर्षीय तरुणाने गळफास घेऊन आपली जीवनयात्रा संपवली आहे. नांदेड पोलीस अधीक्षक कार्यालयातील लिपिकाच्या त्रासाला




कंटाळून तरुणाने हि आत्महत्या केली आहे. याप्रकरणी आखाडा बाळापूर पोलीस ठाण्यात आरोपी विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मात्र या धक्कादायक घटनेनं पोलीस विभागासह जिल्ह्यात एकच खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आत्महत्या करणाऱ्या तरुणाची नांदेड येथील पोलीस अधीक्षक कार्यालयातील लिपिक अभिषेक सातपुते याच्यासोबत मैत्री झाली होती. त्यातून पुढे आत्महत्या करणाऱ्या तरुणाला अनैसर्गिक संबंध ठेवण्यासाठी लिपिक अभिषेक सातपुते याने तगादा लावला. मात्र सततच्या त्रासाला कंटाळून तरुणाने हतबल होऊन रुमालाने गळफास घेत आत्महत्या केलीय. या प्रकरणी आखाडा बाळापूर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सध्या पोलीस या प्रकरणी अधिक तपास करत असून या घटनेनं परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

### अमरावती लैंगिक शोषण प्रकरण

# सीट समोर पहिल्या मुलीने नोंदवला जबाब

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अमरावती** - अमरावतीत हादरवून सोडणाऱ्या अल्पवयीन मुलींच्या लैंगिक शोषण प्रकरणात अखेर एक मोठी कायदेशीर अडचण दूर झाली आहे.

सामाजिक भीती आणि कलंकाची पर्वा न करता, नागपूरच्या एका १५ वर्षीय धाडसी मुलीने पुढे येत विशेष तपास पथकासमोर (एसआयटी) आपला जबाब नोंदवला आहे. या प्रकरणात ओळख पटलेल्या ८ पीडितांपैकी पोलिसांच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन समोर येणारी ही पहिलीच पीडिता ठरली असून, यामुळे आरोपींविरोधात पुराव्यांची साखळी अधिक भक्कम झाली आहे.

पोलिसांनी सुरुवातीला हा गुन्हा स्वतःहून दाखल केला होता, जो केवळ गोपनीय



सूत्रांच्या माहितीवर आधारित होता.

मात्र, आता पीडितेचा प्रत्यक्ष जबाब मिळाल्यामुळे पोलिस एफआयआरमध्ये पॉक्सो आणि माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या अधिक कडक कलमांचा समावेश करणार आहेत.

२५० किलोमीटरचा प्रवास अन असीम धैर्य मिळालेल्या माहितीनुसार, या पीडितेने शनिवारी नागपूर ते अमरावती (परतवाडा) असा तब्बल २५० किलोमीटरचा प्रवास करून पोलिसांच्या चौकशीला सहकार्य केले. यवतमाळच्या पोलिस निरीक्षक यशोधरा मुनेश्वर यांच्या नेतृत्वाखालील महिला पथकाने तिचा जबाब नोंदवून घेतला.

पोलिसांसमोर होते मोठे आव्हान १३ एप्रिल रोजी दाखल झालेला हा गुन्हा तांत्रिक पुराव्यांवर उभा होता. अयानच्या चौकशीत आठ पीडितांची नावे निष्पन्न झाली होती, मात्र एकही पीडिता अधिकृत तक्रार द्यायला तयार नसल्यामुळे कायदेशीर पेच निर्माण झाला होता.

# भारत-अमेरिका व्यापार करारा-वर आजपासून तीन दिवस चर्चा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** - भारत आणि अमेरिका यांच्यातील द्विपक्षीय व्यापार कराराच्या पहिल्या टप्प्यावर चर्चा करण्यासाठी भारताचे सुमारे डझनभर अधिकारी २० एप्रिलपासून वॉशिंग्टनमध्ये तीन दिवसांच्या महत्त्वपूर्ण बैठकीसाठी दाखल झाले आहेत.



अमेरिकेतील बदलत्या आयात शुल्काच्या (टॅरिफ) पार्श्वभूमीवर दोन्ही देश या कराराच्या आराखड्याचा फेरविचार करण्याची शक्यता आहे.

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी विविध देशांवर लादलेल्या आयात शुल्काविरोधात अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने निकाल दिल्यानंतर, ट्रम्प प्रशासनाने २४ फेब्रुवारीपासून पुढील १५० दिवसांसाठी सर्व देशांवर १० टक्के सरसकट आयात शुल्क लागू केले आहे.

### हुंड्यासाठी विवाहितेचा

# शारिरीक व मानसिक छळ : ४ जणांविरुद्ध गुन्हा दाखल

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** - माहेरहुन पैसे आणण्यासाठी विवाहितेचा छळ करुन तिला जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी वरुड पोलिसांनी एकाच कुटुंबातील ४ जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. हा प्रकार गेल्या अनेक दिवसांपासून सुरु होता, अखेर पिडीत महिलेने दिलेल्या तक्रारीवरुन पोलिसांनी ही कारवाई केली आहे.

पोलिस सुत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी संगनमत करुन तिला माहेरुन पैसे आणण्यासाठी सतत तगादा लावला होता. पैसे न




आणल्यास तिला शारिरीक व मानसिक त्रास देऊन मारहाण करण्यात येत होती तसेच आरोपींनी तिला जीवे मारण्याची धमकीही दिली होती. पोलिसांनी याप्रकरणी ४ व्यक्तींविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे. प्रविण नारायणराव बोंदरे (४५), सुमन नारायणराव बोंदरे (६५, दोघेही रा.भिडी उमरी, ता.नरखेड), सुरेखा जितेंद्र पांडव (५०), हेमलता अमोल गायकवाड (३४) दोन्ही रा.वरुड यांचे विरुध्द पोलिसांनी भा.न्या.स.च्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. यामध्ये प्रामुख्याने विवाहितेचा क्रूरपणे छळ करणे, मारहाण आणि समान उद्देशाने केलेले कृत्य करणे ८५, ११५ (२), ३५१ (२), (३), ३ (५) नुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ही घटना १० डिसेंबर २०२५ ते १८ एप्रिल २०२६ या कालावधीत घडली असून, १८ एप्रिल रोजी दुपारी १३:३६ वाजता या गुन्ह्याची अधिकृत नोंद करण्यात आली आहे. वरुड पोलीस या प्रकरणाचा पुढील अधिक तपास करत आहेत.

